महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक यांचे कार्यालय,**
**सहकार संकुल, नॅशनल उर्दूहायस्कूल जवळ,सारडा सर्कल,नाशिक-422001**
फोन क्र. 0253- 2591555 ईमेल ID ddr_nsk@rediffmail.com

4323

जा.क्र.विकास-3/मा.अ.2005/क.4(1) (b)/सन-2021 दिनांक :- 28/07/2021

प्रति,
मा.विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक

**विषय :-** **सार्वजनिक प्राधिकारणाने स्वत:हून किंवा सकारात्मक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4 (1) (b) अन्वये माहिती प्रकट करणेबाबत..**

**संदर्भ :-** 1. आपले कार्यालयाकडील पत्र जा. क्रं.संवका/मा.अ.2005/क.4 (1) (b)/सन 2021 दिनांक 18/05/2021
2. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. वि-3/मा.अ.2005/क.4 (1) (ब)/अंमलबजावणी/ 2021 दिनांक 08/06/2021
3. आपले कार्यालयाकडील अ.शा. पत्र जा. क्रं.संवका/मा. अ. 2005 /क.4 (1) (b)/सन 2021 दिनांक 15/07/2021

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की,

2/- संदर्भिय पत्र क्रं.01 अन्वये विषयांकित माहिती सादर करणेबाबत सूचित केलेले होते. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भिय पत्र क्रं. 02 अन्वये सर्व उप/सहाय्यक निबंधक कार्यालयास सदरची माहिती तात्काळ सादर करणेबाबत सूचित केलेले होते.

परंतु उप/सहाय्यक निबंधक कार्यालयाने सदरची माहिती मुदतीत सादर केलेली नसल्याने आपले कार्यालयास माहिती देणेस विलंब झालेला आहे. तरी या कार्यालयाची व या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयाची माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4 (1) (b) अन्वये प्रकट करावयाची 1 ते 17 मुद्यांबाबत माहिती दरवर्षी दिनांक 01 जानेवारी, व दिनांक 01 जुलै असे वर्षातून किमान दोन वेळा अदयावत करुन प्रसिध्द करणेबाबत सूचित केलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाची दिनांक 30/06/2021 अखेरची (दिनांक 01 जुलै, 2021 रोजी प्रसिध्द करण्यासाठी) सदरची अदयावत माहिती सोबत जोडून सविनय सादर करण्यात येत आहे.

**(डॉ.सतिश खरे)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,नाशिक**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**
मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे.

**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,नाशिक**

केंद्रीय माहिती अधिकार 2005
चे कलम 4 (1) (ब) प्रमाणे
30/06/2021 अखेर 1 ते 17 उपकलमांची
माहिती प्रसिध्द करणेबाबत
(दि.1 जुलै 2021 रोजी प्रसिध्द करण्यासाठी)

कार्यालयाचे नांव

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
सहकार संकुल, नॅशनल ऊर्दु हायस्कुल जवळ,
मौलाना अब्दुल कलाम आझाद रोड
सारडा सर्कल, नाशिक
दुरध्वनी क्रमांक - 0253- 2591555

मुद्दा क्रमांक :- 1 (एक) :-

## कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे नियंत्रणाखालील विषय :-

- प्रशासन (आस्थापना)
- जिल्ह्यातील सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणेबाबत वैधानिक कार्यवाही
- जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँक व पतसंस्थांवर नियंत्रण ठेवणे वैधानिक कार्यवाही.
- जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका.
- सावकारी अधिनियम अन्वये कार्यालयाच्या नियंत्रण
- जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज .
- जिल्हा मध्यवर्ती बँक कामकाज .
- जिल्ह्यातील हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्था, कामकाज.
- शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे.
- अपिल अधिकारक्षेत्रांतर्गत आलेल्या प्रकरणांवर निर्णय घेणे.

**मुद्दा क्रमांक :- 2 (दोन)- अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य**

जिल्हा उपनिबंधक व अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदा-या

| अधिकार पद | प्रशासनिक अधिकार | कायदा/नियम/आदेश/राजपत्र |
|---|---|---|
| जिल्हा उपनिबंधक व त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी | सहकारी संस्था व उपविधी नोंदणी व उपविधीमधील सुधारणा | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 9 , कलम 13 व 14 व नियम 4,5,12 व 13 |
| | संस्थांचे वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी प्रसिध्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 12(3 अ) व नियम 10 |
| | संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी यास मंजूरी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 17 व 18 नियम 16 व 17 |
| | संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 19 व नियम 18 |
| | संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 20 |
| | संस्थेची नोंदणी रद्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 21 |
| | एखादया संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीने केलेले अपिल निकालात काढणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 23 |
| | एखादया सदस्याची संस्थेतून हकालपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देण्यास किंवा सदस्यास पुन:सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास संमती देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 35 व नियम 28 व 29 |
| | संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 44 व नियम 42 |
| | संस्थेचा निधी विशिष्ट रितीने गुंतविण्या बदल आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 70 व नियम 55 |
| | एखादया संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या निश्चित करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 |
| | अधिसूचित संस्थाच्या निवडणुका घेणे व निवडणुक घेण्याचा खर्च विहीत रितीने वसुल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 ए, क क व नियम 56 अ |
| | मुदत संपण्यापुर्वी समितीने निवडणुक न घेतल्यास निबंधकास स्वत:स संस्थेचे व्यवस्थापन आपल्याकडे घेता येईल किंवा प्रशासकाची नेमणुक करता येईल. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 इ |

| | |
|---|---|
| वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यास किंवा तिच्या पुढे ताळेबंद ठेवण्यांच्या बाबतीत कसूर करणारा किंवा विशेष साधारण सभा बोलविण्यात कसूर करणारा अधिकारी किंवा समितीचा सदस्य यास निवडणूकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 75 व 76 |
| वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यासाठी मुदत वाढविणे किंवा अशी सभा बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 75 |
| संस्थेतील विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 76 |
| समितीच्या नवीन समितीच्या सदस्याची किंवा प्रशासकाची नेमणूक करणे/बदलणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ |
| समिती काढून टाकणे आणि नविन समिती किंवा प्रशासक नेमणे, सभासद काढून टाकणे व नेमणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 78 |
| संस्थेस बंधनकारक असतील अशी कामे करुन घेणे आणि त्यास कसुर करण्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 79 |
| संस्थेचे दप्तर किंवा मिळकतीचा ताबा घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 80 |
| संस्थेचे दरवर्षी हिशोब तपासणे किंवा तपासून घेणे व हिशोबातील दोष सुधारण्याचा संस्थेस आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 व 82 |
| संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती याबाबत चौकशी करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 |
| चौकशी किंवा तपासणी यांचे खर्चा बद्दल हुकुम करणे आणि ती वसूल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 85 व 86 |
| संस्थेची पुस्तके तपासणी किंवा तपासून घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 84 |
| संस्थेच्या कारभाराचे निरीक्षण करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 89 अ |
| विविक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची वसुली करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 |
| सहकारी संस्थेस व्यवहार बंद करणे तसेच ऋण परिशोधकाची नेमणूक | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 102 व 103 |

मुद्दा क्रमांक :-3 (तीन) -

## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांची कार्यक्षेत्र रचना

### सहकार खात्याची क्षेत्रीय रचना

सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)

↓

सहकार आयुक्त (राज्य मुख्यालय स्तर)

↓

विभागीय सहनिबंधक (विभाग स्तर)

↓

जिल्हा उपनिबंधक , (जिल्हा स्तर)

↓

तालुका/उप/सहाय्यक निबंधक (तालुका स्तर)

↓

| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
|---|---|---|---|
| सहकार अधिकारी प्रथम श्रेणी | सहकार अधिकारी व्दितीय श्रेणी | सहाय्यक सहकार अधिकारी | लिपीक |

**मुद्दा क्रमांक :-4 (चार ) -**

स्वत: ची कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-5 (पाच) -**

त्यांच्याकडील असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांचे कार्य पार पाडणेसाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सुचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अन्वये**

**मुद्दा क्रमांक :-6(सहा)-** त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विविरण

**वर्गीकरण प्रकार अ (कायम स्वरुपी ठेवावयाची कागदपत्रे)**

- सहकारी संस्थेची नोंदणी व पोटनियम नोंदणी धारिका
- विभागीय सूचना पुस्तिका
- स्थायी आदेश धारिका
- शासन निर्णय
- भौगोलिक बदल आदेश (नवीन कार्यालय स्थापन करणे, बदल्या इ.)
- अभिलेख सुची
- निवाडा व डिक्री ओदश
- जडवस्तू संग्रह नोंदवही
- G.I.S.नोंदवही
- ग्रेडेशन यादी
- म.स.सं.नियम 1961 चे नियम 30 अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- बाजार क्षेत्र जाहिर करणे, नियम आदेश व बाजार समितीच्या विधी व उपविधी
- कर्मचारी नियुक्ती आदेश धारिका (वर्ग-4) सेवा नियम नमुनेदार उपविधी
- नोंदणी क्रमांक वितरण
- नमुनेदार उपविधी (सर्व प्रकार)
- पोटनियम दुरूस्ती व संस्थेच्या नावात बदल
- सावकारी कायदा ,अधिनियम व परिपत्रके
- सावकारी परवाना नोंदवही (नमुना 1 व नियम 3)
- सावकारी परवानाधारक नोंदवही ( कलम 7)
- सावकारी परवाना रद्द आदेश (कलम 11)

**वर्गीकरण प्रकार ब (35 वर्षापर्यंत ठेवायाची कागदपत्रे)**

- लेखापरिक्षण अहवाल
- कार्यक्रम अंदाज पुस्तिका
- पेन्शन प्रकरणे (सर्व)
- बदली आदेश
- बढती आदेश
- सेवापुस्तके
- सावकारी परवाना वितरण, रद्द करणे, नोंदणी अर्ज रद्द करणे

**वर्गीकरण प्रकार क (5 वर्षापर्यत ठेवावयाची क कागदपत्रे)**

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- विधानसभा/विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासने
- कामकाज वाटप आदेश
- तपासणी अहवाल
- आवक-जावक नोंदवही
- लेखन सामुग्री मागणीपत्र
- नियुक्ती आदेश
- नियतकालीन विवरणपत्र सादरीकरण नोंदवही
- जी.डी.सी.ए.व खाते परिक्षा निकालपत्र
- परिक्षा नियोजन धारिका (वेळापत्रक, हजेरीपत्रक)
- नियोजन अंदाजपत्रक
- कार्यभार हस्तांतरण
- प्रमाणित लेखापरिक्षक यांना वाटप केलेल्या संस्थांचे आदेश
- मजुर संस्थां कामकाज वाटप

**मुद्दा क्रमांक:-7(सात) -** आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अमंलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल,

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायदयातील दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

**मुद्दा क्रमांक:-8(आठ)-**

आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे परिशिष्टांचे, समित्यांचे आणि अन्य निकालाचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदाच्या समित्याच्या आणि अन्य निकालाच्या बैठकीत लोकासाठी खुला आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

जिल्हयातील अडचणीतील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी ठोस कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाहीस गती येण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाकडील शासननिर्णय क्रमांक युआरबी -1507/शिकाणा/प्र.क्र. 47/7-स, दिनांक 13/08/2008 अन्वये जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समिती मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कामकाज करते.

महाराष्ट्र राज्य सावकारीच्या व्यवहाराचे नियमनाकरिता महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 हा कायदा दिनांक 4 एप्रिल 2014 रोजीच्या अधिसूचनेव्दारे प्रसिध्द झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक 9 सप्टेंबर 2014 रोजीच्या अधिसूचनेव्दारे ज्या क्षेत्रामध्ये निबंधक आपल्या अधिकाराचा वापर करतील व आपली कर्तव्य पार पाडतील ते क्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. सावकाराने दिलेल्या कर्जावर एका वर्षात किती व्याजदर आकारवयाचा याबाबतची महाराष्ट्र शासनाने 16 सप्टेंबर 2014 रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. सदर कायदयांतर्गत ज्या क्षेत्रात बेकायदेशीर सावकारी व्यवसाय केला जातो त्या क्षेत्रातील सावकाराविरुध्द कलम 16 अन्वये कारवाई करुन सावकारी बाबतची सर्व कागदपत्रे जप्त करण्याचा अधिकार निबंधकांना दिला आहे. संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार कलम 18 नुसार निबंधकांना दिला आहे. सावकारी संदर्भात प्राप्त होणा-या लेखी/ऑनलाईन तक्रारीवर चौकशी करुन कार्यवाही करण्याचा अधिकार निबंधकांना आहे.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमनाबाबत) अधिनियम 1963 चे कलम 11 अन्वये गृहनिर्माण संस्थांनी त्यांचे 7/12 उतारा, प्रॉपर्टी कार्डवर जे प्रवर्तक,विकसक, जमिन मालक नांव लावून देणेस कसूर करतात अशा व्यक्तीं विरुध्द या कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करणे व आदेश पारीत करण्याचे कामकाज चालविले जाते. वैधानिक गृहनिर्माण संस्थांनी अर्ज दाखल केल्यानंतर दोन महिन्यांचे आत अर्जाशी संबंधित त्रुटींची पुर्तता संस्थेस कळविणे, अथवा अर्जामध्ये त्रुटी नसल्यास सुनावणी नोटीस निर्गमित करणे आवश्यक असून अशा विहीत कालावधीत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाते. अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांचे आत अर्जावर निर्णय घेणे आवश्यक असून या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जावर विहीत कालावधीत निर्णय घेतला जातो. मानिव अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेत सुलभता यावी म्हणून शासनाने दिनांक 1 मे 2014 पासून ऑनलाईन प्रणालीव्दारे मानिव अभिहस्तांतरणाचे अर्ज स्विकारण्यात यावे अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यानुसार शासनाने www.mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली असून ऑनलाईन अर्ज भरणेबाबतच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

मुद्दा क्रमांक :- 9 (नऊ)- अधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका

आणि

मुद्दा क्रमांक :-10(दहा)-

आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन,तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसारभरपाई देण्याची पध्दत

| अ क्र. | अधिकार पद | अधिकारी व कर्मचारी नाव(सर्वश्री) | वर्ग | मासिक वेतन (मुळवेतन) |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा उपनिबंधक | सतिश खरे | 1 | 93800/- |
| 2 | सहायक निबंधक | पद रिक्त | 2 | --- |
| 3 | सहायक निबंधक | प्रेरणा शिवदास | 2 | 41800/- |
| 4 | सहायक निबंधक | पदरिक्त | 2 | --- |
| 5 | कार्यलय अधिक्षक.1 | महेश प्र. कासार | 3 | 71200/- |
| 6 | कार्यलय अधिक्षक.2 | छाया अ. राजभोज | 3 | 58500/- |
| 7 | लघुलेखक | पद रिक्त | 3 | --- |
| 8 | मुख्यलिपिक | अशोक प. काकड | 3 | 47600/- |
| 9 | मुख्यलिपिक | शैलेंद्र के. मुरडनर | 3 | 47600/- |
| 10 | मुख्यलिपिक | नंदकिशोर वा.मोरे | 3 | 49000/- |
| 11 | प्रतवारी पर्यवेक्षक | मंजुषा जाधव | 3 | 49000/- |
| 12 | लेखापाल | सुबोध सु. सोदाणकर | 3 | 47600/- |
| 13 | संख्यिकी सहायक | दत्तात्रय भा. मुतडक | 3 | 35900/- |
| 14 | वरिष्ठ लिपिक | कष्णा रा. वाळके | 3 | 33300/- |
| 15 | वरिष्ठ लिपिक | गिरीष के. मुसळे | 3 | 35300/- |
| 16 | वरिष्ठ लिपिक | सचिन रा. काकड | 3 | 29600/- |
| 17 | वरिष्ठ लिपिक | पद रिक्त | 3 | --- |
| 18 | वरिष्ठ लिपिक | श्रीमती सुरेखा दे. पाळदे | 3 | 28700/- |
| 19 | वरिष्ठ लिपिक | हिराजी ना. कनोज | 3 | 32300/- |
| 20 | वरिष्ठ हातमाग पर्यवेक्षक | श्रीमती शुभांगी सं. विसपुते | 3 | 27900/- |
| 21 | कनिष्ठ लिपिक | एच.व्ही. देवळीकर | 3 | 28400/- |
| 22 | कनिष्ठ लिपिक | वत्सला ए.जाधव | 3 | 23800/- |
| 23 | कनिष्ठ लिपिक | पदरिक्त | 3 | --- |
| 24 | कनिष्ठ लिपिक | पदरिक्त | 3 | --- |
| 25 | कनिष्ठ लिपिक | पदरिक्त | 3 | --- |
| 26 | कनिष्ठ लिपिक | पदरिक्त | 3 | --- |
| 27 | कनिष्ठ लिपिक | पदरिक्त | 3 | --- |
| 28 | क.हातमाग पर्यवेक्षक | भिमा प्र. दौंड | 3 | 23100/- |
| 29 | क.हातमाग पर्यवेक्षक | श्रीमती रसिका नि. दहिवाळ | 3 | 23100/- |
| 30 | क.हातमाग पर्यवेक्षक | कुणाल के.साळवे | 3 | 22400/- |
| 31 | वाहन चालक | पंडीत रा. घोडे | 3 | 35000/- |
| 32 | शिपाई | संजय ना.वाघ | 4 | 39900/- |
| 33 | प्रतवारी परिचर | प्रमोद मो. जाधव | 4 | 33700/- |
| 34 | शिपाई | श्रीमती वैशाली ज्ञा.लोणारे | 4 | 17500/- |
| 35 | शिपाई | पकाश ना.चौधरी | 4 | 16000/- |
| 36 | शिपाई | हिरामन चि. भोई | 4 | 16000/- |
| 37 | रात्र पहारेकरी | देविदास रा. पाळदे | 4 | 32400/- |

**मुद्दा क्रमांक :-11(अकरा)-**

सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमूण दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमांचा अहवाल.

**वार्षिक योजना सन 2020-21 माहे.मार्च, 2021 अखेर झालेला खर्च.**

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-12(बारा)-**

अर्थसहाय्य् कार्यक्रमांच्या अमंलवजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभ धारकांचा तपशील

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-13(तेरा)-**

ज्या व्यक्तींना सवलती ,परवाने व प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.

**जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयमार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती.**

**सन 2020-2021** **(रु. लाखात)**

| अ.क | गौणशिर्ष, उपशिर्ष, प्राथमिक घटक | सन 2020-2021चा अंतिम सुधारीत अर्थसंकल्पीय तरतुद | माहे मार्च, 2021 अखेर झालेला खर्च. | समर्पित बचत झाल्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| 1 | 107 (02) (04) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (व्याज सवलत) (जनरल)24251009 | 89.96 | 89.96 | 0.0 |
| 2 | 107 (02) (04) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (विघयो)24251223 | 1.84 | 1.84 | 0.0 |
| 3 | डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (आउयो)24251134 | 5.00 | 4.96 | 0.4 |
| 4 | 03 (01) आदिवासी सहकारी संस्थांच्या पुर्नरचनेसाठी व्यवस्थापकीय अनुदान (24250817). | ---- | ---- | ---- |
| 5 | 102 (02) (02) गट पातळीवरील ग्रामिण कारागीरांच्या (बलुतेदार) औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान.48510811 | ---- | ---- | ---- |
| 6 | 108 (03) (08) आदिवासी शेतक-यांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरीता अर्थसहाय्य. (22251535) | ---- | ---- | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | आदिवासी सहकारी संस्थेचे शेअर्स खरेदीसाठी सात वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्ज. (62250044) | ---- | ---- | ---- |
| | एकुण :- | 96.8 | 96.76 | 0.4 |

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना.(सर्वसाधारण) (विघयो) व (आदिवासी उपयोजना) |
| अ. | योजना केव्हापासून कार्यान्वित आहे. | 1991 |
| ब. | योजनेचा उद्देश व स्वरुप. | या योजनेंतर्गत जे शेतकरी रु.100000/-वा त्यापेक्षा कमी पीक कर्ज घेतात आणि त्या कर्जाची व्याजासह संपूर्ण परतफेड 30 जूनच्या आत करतात त्या शेतक-यांना भरणा केलेल्या व्याजापैकी 3 टक्के व्याज अनुदान तसेच रु.100001/- रु.300000/- पर्यंत कर्ज घेणा-या शेतक-यांना 1 टक्के व्याज सवलत पीक उत्पादन प्रोत्साहनासाठी शासनाकडून देण्यात येते. शेतक-यांच्या पीक कर्जाची वेळेवर परतफेड होऊन या योजनेचा जास्तीत जास्त शेतक-यांना लाभ मिळावा या योजनेचा उद्देश आहे. शिवाय ही व्याज सवलत योजना असल्यामुळे शेतक-यांना पीक उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. |
| क. | लाभार्थी. | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाचे नियमित परतफेड करणारे कर्जदार सभासद. |
| ड. | अर्ज कोणाकडे करावयाचा. | उप/ सहाय्यक निबंधक. |
| इ. | मंजुरीचे अधिकार. | जिल्हा उपनिबंधक. |

**मुद्दा क्रमांक :-14 (चौदा)-**

इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात व्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबधात तपशील

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-15(पंधरा)-**

माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील,तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक या कार्यालयाच्या सूचना फलकाव उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील प्रसिध्द केलेला आहे.

**मुद्दा क्रमांक :-16(सोळा)-**

## नाशिक जिल्हयातील शासकीय जनमाहिती अधिकारी यांची डिरेक्टरी

| अ.क्र | कार्यालयाचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक कार्यालय सहकार संकुल, सारडा संर्कल नाशिक | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | 1.श्री एम.पी .कासार कार्यालय अधिक्षक 1.<br>2.श्रीमती सी.ए.राजभोज कार्यालय अधिक्षक 2.<br>दु.क्र.0253-2591555 | श्री.माधव शिंदे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (1)<br>श्रीमती प्रेरणा शिवदास सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (2) |
| 2 | उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका दुरध्वनी क्रमांक 0253-2508222 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री. पी. जी. महाजन सहकार अधिकारी (1) | फयाज मुलाणी उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका जिल्हा.नाशिक |
| 3 | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका दुरध्वनी क्रमांक 02554-255376 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री.एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रेणी) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |
| 4 | सहाय्यक निबंधर्क सहकारी संस्था सटाणा तालुका जिल्हा नाशिक दुरध्वनी क्रमांक 02555-224433 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री शरद गोविंदराव दराडे सहकार अधिकारी (1) | श्री महेश भडांगे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सटाणा |
| 5 | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था निफाड तालुका जिल्हा नाशिक दुरध्वनी क्रमांक 02550-241138 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री राजेश शंकर ढवळे सहकार अधिकारी (1) | श्री अभिजीत देशपांडे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था निफाड |
| 6 | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नांदगाव तालुका जिल्हा नाशिक दुरध्वनी क्रमांक 02552-242648 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री एन.व्ही.साळवे सहकार अधिकारी (1) | श्री पी.जी.देवरे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था नांदगाव |
| 7 | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था दिंडीरी तालुका जिल्हा नाशिक दुरध्वनी क्रमांक 02557-221067 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री एम. डी. परदेशी सहकार अधिकारी (1) | श्री चंद्रकांत विघ्ने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था दिंडोरी |
| 8 | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका कळवण जिल्हा नाशिक दुरध्वनी क्रमांक 02592-221127 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री हेमंत बि-हाडे सहकार अधिकारी (2) | श्री के.डी.गायकवाड सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कळवण |
| 9 | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था देवळा तालुका जिल्हा नाशिक 02595-228080 | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | श्री.डी.एन. देशमुख सहकार अधिकारी (1) | श्री सुजय पोटे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था देवळा |

| अ.क्र | कार्यालयाचे नाव पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 10 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था सुरगाणा<br>तालुका जिल्हा नाशिक<br>दुरध्वनी क्रमांक<br>02593-223340 | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्री बी.एन.मवाळ<br>मुख्य लिपिक | श्री .माधव शिंदे<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था सुरगाणा |
| 11 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था पेठ<br>तालुका जिल्हा नाशिक | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्री आर.आर.इप्पर<br>सहकार अधिकारी (1) | श्री .चंद्रकांत विघ्ने<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था पेठ |
| 12 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था इगतपुरी<br>तालुका जिल्हा नाशिक<br>दुरध्वनी क्रमांक<br>02553-244180 | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्रीम.प्रमिला जाधव<br>मुख्यलिपीक | श्री बी.एस.जाधव<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था इगतपुरी |
| 13 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था चांदवड<br>तालुका जिल्हा नाशिक<br>दुरध्वनी क्रमांक<br>02556-252325 | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्री एस.जी.खैरनार<br>सहकार अधिकारी (1) | श्री पी.एस.पाटोळे<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था चांदवड |
| 14 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था सिन्नर<br>तालुका जिल्हा नाशिक<br>दुरध्वनी क्रमांक<br>02551-220706 | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्री एस. बी. कासार<br>सहकार अधिकारी (1) | श्री एस.पी.रुद्राक्ष<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था सिन्नर |
| 15 | सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था येवला<br>तालुका जिल्हा नाशिक<br>दुरध्वनी क्रमांक<br>02559-265186 | शाखाप्रमुख<br>(संबधीत कर्मचारी) | श्री आर. पी.जाधव<br>सहकार अधिकारी (1) | श्री एकनाथ पाटील<br>सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था येवला |

**मुद्दा क्रमांक :-17 (सतरा)-**

विहीत करण्यात येईल अशी माहिती.
वार्षिक माहिती संबंधी या कार्यालयाचे सांख्यिकी शाखा कामकाजाचे स्वरुप खालीलप्रमाणे :-

1. **वा-24/ऍपेंडिक्स ओ -**

दरवर्षी माहे मार्च अखेर अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या निश्चीत करणे, वर्षाअखेर नवीन नोंदणी झालेल्या/पुर्नजिवन झालेल्या/अवसायानात घेतलेल्या रद्द केलेल्या संस्थांची संख्या प्रत्येक तालुक्याकडून घेऊन जिल्हयाची एकत्रित संख्या मुख्य कार्यालयास सादर करणे.

2. **वार्षिक माहिती तक्ते 10 ते 51 (ANR TABLES) सादर करणे.**

दरवर्षी वा-24 नुसार निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची वार्षिक माहिती संस्थांच्या प्रकारनिहाय सर्व तालुक्यांकडून प्राप्त करुन घेऊन जिल्हयाचे एकत्रिकरण करुन माहिती मुख्य कार्यालय, पुणे यांना सादर करण्यात येते.

3. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन/राज्य सांख्यिकी गोषवार/तालुका निवडक निर्देशांक :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन/तालुका निवडक निर्देशांक हे प्रकाशन दरवर्षी जिल्हा सांख्यिकी गोषवारा हे प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयातर्फे प्रकाशीत करण्यात येते. सदर प्रकाशनाकरीता आवश्यक असलेली माहिती वार्षिक माहितीच्या तक्त्यांच्या आधारे किंवा आवश्यक्यता वाटल्यास तालुका कार्यालयाकडून/लेखापरिक्षण यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन जिल्हा सांख्यिकी कार्यालयास सादर केली जाते.

4. **इतर :-**

**मुख्य** कार्यालय, पुणे तसेच मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक कार्यालयाकडून मागविलेली सांख्यिकी विषयक माहिती सादर करणे. तसेच खाजगी संस्था/व्यक्तिंनी मागितलेली सांख्यिकी माहिती/आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे.

(डॉ.सतिश खरे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक